महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
बांधकाम भवन,२५ मर्झबान पथ,फोर्ट, मुंबई-४०० ००१
Email ID:rdd.est15-mh@mah.gov.in

क्रमांक: - जीपीडीपी-२०२६/प्र.क्र.८०/१६७५५१८/आस्था-१५ दिनांक : २४ सप्टेंबर, २०२६.

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सर्व

**विषय : Reform Utsav व People's Plan Campaign (PPC) उपक्रम राबविण्यासाठी व सनियंत्रण करण्यासाठी जिल्हा / तालुका स्तरावरील नोडल अधिकारी यांची नियुक्ती करणे तसेच दिनांक २ ऑक्टोबर, २०२६ रोजी ग्रामसभांचे आयोजन करणेबाबत मार्गदर्शक सूचना.**

**संदर्भ :** १.सचिव, पंचायती राज मंत्रालय, भारत सरकार यांच्या अध्यक्षतेखाली दि.२२.९२०२६ रोजी आयोजित Video Conference मधील निर्देश.
२. Joint Advisory, GoI, D.O. No. M-11015/355/2026-CB, दि.२२.०९.२०२६.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये, दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुद्धा दिनांक २ ऑक्टोबर, २०२६ पासून People's Plan Campaign (PPC) अर्थात "सबकी योजना, सबका विकास" अंतर्गत पंचायत विकास आराखडा तयार करण्याची प्रक्रिया राबविण्यात येत आहे. यासाठी दिनांक २ ऑक्टोबर, २०२६ रोजी घेण्यात येणाऱ्या ग्रामसभेमध्ये याबाबत माहिती द्यावयाची आहे. या अभियानासोबत केंद्र शासनाच्या निर्देशानुसार "Reform Utsav" हा उपक्रम एकत्रितपणे राबविण्यात येणार आहे. या माध्यमातून शासनाच्या विविध विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या सुधारणा, नागरिककेंद्री उपक्रम व सार्वजनिक सेवांशी संबंधित बाबींची माहिती दिनांक २ ऑक्टोबर, २०२६ रोजी होणाऱ्या ग्रामसभेच्या माध्यमातून नागरिकांपर्यंत पोहोचविणे तसेच संबंधित बाबींचा स्थानिक विकास आराखड्याशी समन्वय साधणे अपेक्षित आहे.

Reform Utsav मध्ये पंचायती राज मंत्रालय, ग्रामीण विकास विभाग, पेयजल व स्वच्छता विभाग, ग्राहक व्यवहार विभाग, अन्न व सार्वजनिक वितरण विभाग, जलसंपदा, नदी विकास व गंगा पुनरुज्जीवन विभाग व भूमिसंपदा विभाग यांचा सहभाग असणार आहे. तसेच **युवा व्यवहार व क्रीडा विभाग** (Department of Youth Affairs and Sports) **अंतर्गत** MY Bharat स्वयंसेवक ग्रामसभेमध्ये नागरिकांचा अधिकाधिक सहभाग वाढविण्यासाठी तसेच विविध सुधारणांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी सहकार्य करतील.

Reform Utsav व "सबकी योजना, सबका विकास" (PPC) या दोन्ही उपक्रमांची जिल्हा, तालुका व ग्रामपंचायत स्तरावर प्रभावी, समन्वयित व वेळबद्ध अंमलबजावणी होण्यासाठी जिल्हा /तालुका पातळीवर नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याबाबत सचिव, पंचायती राज मंत्रालय, भारत सरकार यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २२ सप्टेंबर २०२६ रोजी

आयोजित Video Conference मध्ये सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार जिल्हा पातळीवर उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) व तालुका पातळीवर गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी २ ऑक्टोबर, २०२६ रोजी होणाऱ्या ग्रामसभेत संबंधित विभाग आणि पंचायतींच्या सक्रिय सहभागासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी.**

➤ ग्रामपंचायत स्तरावर राबिवण्यात येणारे विविध उपक्रम

१. **अजेंडा प्रसिद्धी / विषयसूची प्रसारित करणे:** ग्रामपंचायत सचिव सुधारणा उत्सवाच्या अजेंड्याचे (विषयसूचीचे) वाचन करतील आणि विविध सुधारणांचे स्पष्टीकरण देतील.

२. **ग्रामसभा चर्चा:** नागरिकांना प्रश्न विचारण्यासाठी, चर्चा करण्यासाठी, स्थानिक उदाहरणे मांडण्यासाठी आणि अभिप्राय देण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करणे. ग्रामपंचायत सुलभकर्ता (Facilitator) व 'माय भारत' स्वयंसेवक यादरम्यान चर्चा घडवून आणण्यास व अभिप्राय नोंदवून घेण्यास मदत करतील.

३. **दृश्य सादरीकरण आणि माहिती प्रसार** (IEC): विविध विभागांचे अधिकृत रील्स, लघुपट आणि फोटो दाखवणे. माहिती देणारे पोस्टर्स व पत्रके वितरित करणे. लाभार्थ्यांच्या मदतीसाठी प्रदर्शने व मदत कक्ष सुरू करणे.

४. **लाभार्थी अनुभव कथन** (Testimonials): संबंधित विविध सुधारणांविषयी आपले मनोगत व अनुभव व्यक्त करण्यासाठी लाभार्थी आणि ग्रामस्थांना आमंत्रित करणे.

५. **अभिलेख / दस्तऐवजीकरण:** पंचायत निर्णय पोर्टलवर बैठकीचे वेळापत्रक निश्चित करणे आणि सभासार प्रणालीद्वारे इतिवृत्त नोंदवणे. प्रचार-प्रसार व अहवालासाठी योग्य छायाचित्रे आणि चित्रफिती (Short Video Clips) काढणे.

➤ **प्रसिद्ध करावयाच्या सुधारणा** (Reforms to be Disseminated)

| मंत्रालय / विभाग | **थोडक्यात सुधारणा अजेंडा** (Reform Agenda in brief) |
|---|---|
| पंचायती राज मंत्रालय | **(i) वित्त आयोगाच्या निधीच्या वाढीव हस्तांतरणाद्वारे 'सशक्त पंचायत':** १६ व्या वित्त आयोगाअंतर्गत (२०२६-३१) ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी (RLBs) एकूण ₹४.३५ लाख कोटींची शिफारस करण्यात आली आहे, जी १५ व्या वित्त आयोगापेक्षा ८४% जास्त आहे. 'ग्रामपंचायत विकास आराखड्याच्या' (GPDP) माध्यमातून मंत्रालयाने या वाढीव संसाधनांना ग्रामसभेच्या प्राधान्यक्रमांशी जोडणारी एक रचनाबद्ध प्रक्रिया स्थापित केली आहे.<br>**(ii) स्वामीत्व (SVAMITVA) योजना:** ग्रामीण वस्तीस्थान (आबादी) क्षेत्रातील निवासी मालमत्ता धारकांसाठी कायदेशीर मालकी हक्काचे दस्तऐवज (हक्कसोड/सनद) उपलब्ध करून देणे. |
| ग्रामीण विकास विभाग | **(i) व्हीबी-जी राम जी** (VB–G RAM G): विकसित भारत @२०४७ च्या संकल्पनेशी सुसंगत असलेली एक महत्त्वपूर्ण सुधारणा. ही योजना प्रत्येक ग्रामीण कुटुंबाला दर आर्थिक वर्षात १२५ |

| मंत्रालय / विभाग | थोडक्यात सुधारणा अजेंडा (Reform Agenda in brief) |
|---|---|
| | दिवसांच्या रोख रोजगाराची वैधानिक हमी देते, तसेच उपजीविकेला प्रोत्साहन, उत्पादक मालमत्ता निर्मिती, विविध योजनांचा संगम (Convergence) आणि लवचिक ग्रामीण विकासाला चालना देते.<br>(ii) **६ कोटी लखपती दिदी निर्मितीचे उद्दिष्ट** (Mission to create 6 crore Lakhpati Didis): स्वयंसहायता समूहातील (SHG) महिलांना केवळ उदरनिर्वाहाच्या टप्प्यातून बाहेर काढून शाश्वत कौटुंबिक समृद्धीकडे नेणे. विविध उपजीविकेची साधने, व्यवसाय, वित्तपुरवठा, कौशल्य विकास आणि बाजारपेठ उपलब्ध करून देत कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न किमान ₹१ लाख प्राप्त करण्याचा स्पष्ट मार्ग तयार करणे. |
| पेयजल व स्वच्छता विभाग | (i) **जल जीवन मिशन** (Jal Jeevan Mission): देशातील ग्रामीण कुटुंबांना कार्यरत नळ जोडणीद्वारे पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी राबविण्यात येणारा जगातील सर्वात मोठ्या प्रमाणावरील कार्यक्रम. (ii) स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण): देशाला हागणदारीमुक्त (ODF) घोषित करणे, प्राप्त झालेला ODF दर्जा कायम राखणे तसेच गावांचे ODF Plus (Model) गावे म्हणून रूपांतर करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणारा व्यापक वर्तनपरिवर्तन कार्यक्रम. |
| ग्राहक व्यवहार विभाग | (i) BIS हॉलमार्किंग: ग्राहक संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण उपाययोजना. (ii) राष्ट्रीय ग्राहक हेल्पलाइन: तंत्रज्ञानाधारित तक्रार निवारण यंत्रणेद्वारे ग्राहकांच्या तक्रारींचे निराकरण करण्याची सुविधा. |
| अन्न व सार्वजनिक वितरण विभाग | (i) **प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना** (PMGKAY): ८१ कोटींपेक्षा अधिक लाभार्थ्यांना मोफत अन्नधान्य उपलब्ध करून देणारी जगातील सर्वात मोठ्या अन्नसुरक्षा कल्याणकारी योजनांपैकी एक. (ii) वन नेशन वन रेशन कार्ड (ONORC): सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील (PDS) महत्त्वपूर्ण सुधारणा. या अंतर्गत लाभार्थ्यांना नवीन शिधापत्रिका काढण्याची आवश्यकता न राहता देशातील कोणत्याही स्वस्त धान्य दुकानातून (Fair Price Shop – FPS) त्यांच्या हक्काचे अन्नधान्य प्राप्त करता येते. |
| जलशक्ती मंत्रालय – जलसंपदा, नदी विकास व | जलसंचय जन भागीदारी (Jal Sanchay Jan Bhagidari – JSJB) : **"Catch the Rain"** उपक्रम: भारताच्या जलसुरक्षा धोरणामध्ये या |

| मंत्रालय / विभाग | थोडक्यात सुधारणा अजेंडा (Reform Agenda in brief) |
|---|---|
| गंगा पुनरुज्जीवन विभाग | उपक्रमाच्या माध्यमातून महत्त्वपूर्ण परिवर्तन घडून आले आहे. कमी खर्चाच्या व समुदायाच्या सहभागातून उभारण्यात आलेल्या संरचनांच्या माध्यमातून पावसाच्या पाण्याचे संधारण व संचयन करण्यात येत आहे. यामुळे जलसंधारणाचा उपक्रम केवळ शासनाच्या पुढाकारापुरता मर्यादित न राहता देशव्यापी जनआंदोलन म्हणून विकसित झाला आहे. देशभरात एकूण १.५० कोटींपेक्षा अधिक कृत्रिम भूजल पुनर्भरण संरचना निर्माण करण्यात आल्या आहेत. ही उपलब्धी समुदायाच्या सहभागातून राबविण्यात आलेल्या जगातील सर्वात मोठ्या जलसंधारण उपक्रमांपैकी एक म्हणून अधोरेखित करता येते. |
| भूमी संसाधन विभाग | (i) डिजिटल इंडिया भू-अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रम **(DILRMP):** डिजिटल स्वरूपातील भू-अभिलेख नागरिकांना सुलभतेने उपलब्ध करून देणे. (ii) पाणलोट क्षेत्र विकास प्रकल्प **(Watershed Development Projects)**: प्रति हेक्टर अधिक निधीची उपलब्धता आणि प्रकल्पांची जलद पूर्णता यावर भर देऊन शेतकऱ्यांना जलदगतीने लाभ उपलब्ध करून देणे. |

➤ **नियुक्त करण्यात येणाऱ्या जिल्हास्तरीय नोडल अधिकाऱ्यांची प्रमुख जबाबदारी पुढीलप्रमाणे राहील :**

१. जिल्ह्यात दिनांक २ ऑक्टोबर, २०२६ रोजी होणाऱ्या ग्रामसभेमध्ये Reform Utsav व PPC उपक्रमाच्या अंमलबजावणीचे समन्वय व सनियंत्रण करणे.

२. संबंधित विभागांशी समन्वय साधून विभागनिहाय उपक्रम ग्रामसभेत मांडण्यासाठी आवश्यक कार्यवाही करणे.

३. तालुका व ग्रामपंचायत स्तरावर उपक्रमाच्या अंमलबजावणीबाबत मार्गदर्शन करणे.

४. दिनांक २ ऑक्टोबर, २०२६ रोजी होणा-या ग्रामसभेमध्ये नागरिकांना समजेल अशा सोप्या व स्थानिक भाषेतील माहितीचा वापर करणे.

५. दिनांक २ ऑक्टोबर, २०२६ रोजी होणा-या ग्रामसभेमध्ये IEC साहित्य, पोस्टर्स, फ्लिपचार्ट, लघु व्हिडिओ/रील्स, छायाचित्रे इत्यादी माध्यमांचा प्रभावी वापर करण्यासाठी आवश्यक समन्वय करणे.

६. Reform Utsav अंतर्गत चर्चिलेल्या संबंधित बाबींचा पंचायत विकास आराखड्याशी, विशेषतः ग्रामपंचायत विकास आराखड्याशी (GPDP) समन्वय साधण्यासाठी मार्गदर्शन करणे.

७. तालुका स्तरावरून प्राप्त प्रगतीचा आढावा घेऊन आवश्यक अहवाल वरिष्ठ कार्यालयास सादर करणे.

➢ **तालुकास्तरीय नोडल अधिकाऱ्यांची प्रमुख जबाबदारी पुढीलप्रमाणे राहील :**

१. तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये दिनांक २ ऑक्टोबर, २०२६ रोजी होणाऱ्या ग्रामसभेमध्ये Reform Utsav व PPC उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करणे.

२. ग्रामपंचायत स्तरावरील अधिकारी व संबंधित विभागांमध्ये समन्वय साधणे.

३. दिनांक २ ऑक्टोबर, २०२६ रोजी होणाऱ्या ग्रामसभेच्या अजेंड्यामध्ये Reform Utsav च्या विषयांचा समावेश करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन करणे.

४. दिनांक २ ऑक्टोबर, २०२६ रोजी होणाऱ्या ग्रामसभेत शासनाच्या विविध सुधारणा व नागरिककेंद्री उपक्रमांची माहिती स्थानिक भाषेत सादर करण्यासाठी ग्रामपंचायतींना मार्गदर्शन करणे.

५. ग्रामसभा व PPC प्रक्रियेद्वारे प्राप्त झालेल्या स्थानिक गरजा व संबंधित बाबींचा पंचायत विकास आराखड्यामध्ये समावेश करण्यासाठी मार्गदर्शन करणे.

६. दिनांक २ ऑक्टोबर, २०२६ रोजी होणाऱ्या ग्रामसभेची ग्रामपंचायतींकडून प्राप्त माहितीचे संकलन करून जिल्हास्तरीय नोडल अधिकाऱ्यास अहवाल सादर करणे.

वरील मुद्यांच्या अनुषंगाने, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी २ ऑक्टोबर, २०२६ रोजी होणाऱ्या ग्रामसभेमध्ये Reform Utsav व People's Plan Campaign (PPC) उपक्रम राबविण्यासाठी व सनियंत्रण करण्यासाठी जिल्हा / तालुका स्तरावरील नोडल अधिकारी यांची वरील प्रमाणे नियुक्त करून सदर उपक्रमाची अंमलबजावणी २ ऑक्टोबर २०२६ पासून सुरू होणाऱ्या People's Plan Campaign सोबत एकत्रितपणे करण्यात यावी. उपक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये सर्व संबंधित विभागांचा सक्रिय सहभाग व आवश्यक समन्वय निश्चित करावा.

24.9.2026

(डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार)
सचिव, महाराष्ट्र शासन

सोबत-केंद्र शासनाच्या ७ विभागांच्या मा. सचिव यांच्या स्वाक्षरींची Joint Advisory

**प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी :**

१. संचालक, पंचायत राज, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. संचालक, राज्य ग्रामीण विकास संस्था, यशदा, पुणे
३. अपर आयुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व)
४. निवड नस्ती (आस्था-१५)

Sanjeev Chopra
Secretary
Department of Food &
Public Distribution

Nidhi Khare
Secretary
Department of Consumer
Affairs

सत्यमेव जयते

Dr. Vineet Joshi
Secretary
Ministry of Panchayati Raj

Narendra Bhooshan
Secretary
Department of Land Resources

Ashok K. K. Meena
Secretary
Department of Drinking
Water & Sanitation

Rohit Kansal
Secretary
Department of Rural
Development

Archana Varma
Secretary
Department of Water
Resources, River Development
and Ganga Rejuvenation

**D.O. No. M-11015/355/2026-CB** **Dated: 22nd September, 2026**

**Subject: Execution and launch of "Reform Utsav" integrated with the People's Plan Campaign (PPC) – reg.**

**Dear Chief Secretary/Administrator,**

The People's Plan Campaign (PPC) – 'Sabki Yojana Sabka Vikas' is rolled out annually for preparation of the Panchayat Development Plan (PDP), with active participation of stakeholders including line departments. The Government of India has undertaken several citizen-centric reforms and initiatives to improve ease of living and access to public services. 'Reform Utsav' provides an opportunity to bring these reforms together, build public awareness and engage citizens in discussions on their benefits and effective implementation. As part of this initiative, the People's Plan Campaign (PPC), commencing on 2 October, will provide a platform through Gram Sabhas to discuss these reforms and integrate relevant actions into Panchayat Development Plans, particularly GPDPs, for coordinated implementation at the grassroots.

2. Therefore, it is suggested that the 'Reform Utsav' may be integrated with the existing agenda of the Gram Sabha. The key reforms identified by the participating Ministries/ Departments may be presented briefly in simple, citizen-friendly and, preferably, local-language formats through flip charts, posters, IEC material, short videos/reels and photographs. The suggested structure for the Gram Sabha and the key reforms proposed for dissemination, IEC materials and discussion content for the Gram Sabha will be shared subsequently.

3. The Chief Secretaries are, therefore, requested to designate Department-wise State Nodal Officers for Department of Rural Development, Agriculture, Watershed Development, Land Resources, Panchayati Raj, Drinking Water & Sanitation, Revenue, Food & Public Distribution, PHED, Women & Child Development, Health, Education, etc. to coordinate with the State

Panchayati Raj Department (PRD) and field functionaries for joint planning and implementation, support the 'Reform Utsav', and strengthen the PPC process and the resulting GPDPs.

4. The State Governments/UT Administrations are also requested to issue necessary instructions to the concerned departments and Panchayats for timely preparations and active participation of line departments in the Gram Sabha on 2 October. Key decisions and citizen suggestions and relevant local priorities emerging from the discussions may, wherever appropriate, be linked with the GPDP and convergence process. This will help 'Reform Utsav' serve as a citizen-centric platform for awareness, participation and local action towards grassroots reforms and the vision of Viksit Bharat @2047.

5. In this regard, the Ministry of Panchayati Raj will issue SOP for the PPC, outlining the key activities and defining the roles and responsibilities of various stakeholders. The SOP will also cover the 'Reform Utsav' and will be discussed with and shared soon with the State PRDs to facilitate coordinated implementation.

With warm regards,

**Yours sincerely,**

**(Sanjeev Chopra)**
**Department of Food & Public Distribution**

**(Dr. Vineet Joshi)**
**Ministry of Panchayati Raj**

**(Nidhi Khare)**
**Department of Consumer Affairs**

**(Narendra Bhooshan)**
**Department of Land Resources**

**(Ashok K. K. Meena)**
**Department of Drinking Water & Sanitation**

**(Rohit Kansal)**
**Department of Rural Development**

**(Archana Varma)**
**Department of Water Resources, River Development and Ganga Rejuvenation**

**To**
The Chief Secretaries/Administrators of all States/UTs

**Copy to:**
Additional Chief Secretaries/ Principal Secretaries/Secretaries, All Related Departments, All States/ UTs.